# केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>योजना</th><th>योजनेचा तपशिल</th></tr>
<tr><td>1</td><td>योजनेचे नांव</td><td>केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना</td></tr>
<tr><td>2</td><td>योजने बद्दलचा शासन निर्णय</td><td>उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा. नि. क्र. संकीर्ण 2007/(542/07)/तांशि-1<br>दि. 21.1.2008</td></tr>
<tr><td>3</td><td>योजनेचा स्वरूप</td><td>केंद्रशासनाकडून राज्यातील मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व बौध्द या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन 2007-08 पासून राबविण्यात येते.<br>सदर शिष्यवृत्ती 11 वी ते पी. एचडी., व्यावसायिक (डी.एड, बी.एड, एम.एड, आय.टी.आय) सर्व अभ्यासक्रमांना देण्यात येते. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून)<br>केंद्रशासनाकडून या शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी 47575 संच निर्धारीत करण्यात आलेले आहेत. त्यापैकी मुलींसाठी 30 टक्के संच राखीव आहेत.<br><table><tr><th>अ.क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>संच</th><th>अ.क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>संच</th></tr><tr><td>1</td><td>मुस्लीम</td><td>27734</td><td>4</td><td>पारशी</td><td>96</td></tr><tr><td>2</td><td>ख्रिश्चन</td><td>2309</td><td>5</td><td>जैन</td><td>2994</td></tr><tr><td>3</td><td>शीख</td><td>477</td><td>6</td><td>बौध्द</td><td>13965</td></tr></table></td></tr>
<tr><td>4</td><td>योजनेचा उद्देश</td><td>अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे.</td></tr>
<tr><td>5</td><td>योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव</td><td>मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व बौध्द या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू आहे.</td></tr>
<tr><td>6</td><td>योजनेच्या प्रमुख अटी</td><td>१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२. मागील वार्षिक परिक्षेत किमान 50 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.<br>४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. 2.00 लाख पेक्षा जास्त नसावे.<br>५. एका कुटूंबातील फक्त 2 अपत्यांनांच सदर योजनेचा लाभ घेता येईल.<br>६. शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा. तसेच मागील वार्षिक परिक्षेत किमान 50 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>७. विद्यार्थ्यांने कोणत्याही राष्ट्रीयीकृत बॅंकेमध्ये स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>7</td><td>आवश्यक कागदपत्रे</td><td>१. मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.<br>२. सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>३. सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले रहिवास प्रमाणपत्र आवश्यक.<br>४. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती.<br>५. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.<br>६. अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषीत प्रमाणपत्र.</td></tr>
<tr><td>8</td><td>दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप</td><td>केंद्रशासनाच्या नियमानुसार अभ्यासक्रमाचे शुल्क / शिक्षण शुल्क (course / Tution fee), परिरक्षण भत्ता (Maintenance Allowance) हे लाभ देण्यात येतात.<br>सदर रक्कम ही अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत विद्यार्थ्यांचे थेट बॅंक खातेवर {DBT} जमा करण्यात येते.</td></tr>
<tr><td>9</td><td>अर्ज करण्याची पध्दत</td><td>नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>10</td><td>ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ</td><td>www.scholarships.gov.in</td></tr>
</table>